# "पॉज" (11)

वक्त्याला भाषणात, नेत्याला सार्वजनिक जीवनात, लेखकाला लिखाणात, अभिनेत्याला अभिनयात केव्हा पॉज घ्यावे हे कळत नसेल तर त्याच्या कलेची, कर्तृत्वाची किंमत राहात नाही. पॉज. हा छोटासा दोन अक्षरी शब्द आयुष्यात मोठे धडे शिकवतो. बरेचदा अनेक अभिनेते-अभिनेत्री आपल्या नेहमीच्याच भूमिकेतून प्रेक्षकांच्या मनात कोरल्या गेलेली इमेज बदलण्यासाठी किंवा इतर शैलीतील भूमिकाही आपण चांगली वठवू शकतो हे सिद्ध करून आपल्या अभिनयाच्या कक्षा रूंदावण्यासाठी काही काळ पॉज घेतात. वक्ता जर मोनोटोनसली भाषण देत असेल, तर श्रोतावर्गही कंटाळतो. अशा वेळी हा पॉज महत्त्वाची भूमिका निभावतो. वक्त्याला आपल्या भाषणादरम्यान शेवटपर्यंत आपल्या श्रोत्यांमध्ये इंटरेस्ट कसा कायम राहणार हे कळणे गरजेचे असते. आपलं भाषण कोणत्या क्षणी थांबवलं पाहिजे, कुठे आपण पॉज घेतला पाहिजे हे सुद्धा कळले पाहिजे. बरेचदा वक्त्यांना हे कळत नाही. म्हणूनच खऱ्या दाद देणाऱ्या टाळ्या फार कमी वक्त्यांच्या नशिबी येतात. ऐकण्यास रटाळ वाटत असलेले भाषण थांबायला पाहिजे म्हणून बरेचदा श्रोतावर्ग टाळ्या वाजवत असतो. याचे कारण आहे, वक्त्याला भाषणात योग्य ठिकाणी पॉज घेण्याची, भाषण थांबवण्याची समज नसणे. पॉज आपल्याला जागोजागी शिकवण देत असतात. राजकारणात पण पॉज आवश्यक असतो का? तर या प्रश्नाचे उत्तर सुद्धा हो असेच आहे. अनेकदा राजकारणातून बातम्या येत असतात कि अमुक तमुक ज्येष्ठ नेत्यांची पदासाठीची महत्वाकांक्षा अजूनही अस्तित्वात आहेच. या अशा प्रकारामुळे नवीन पिढी आणि जुनी पिढी असा संघर्ष उद्भवतो. बऱ्याचदा पक्षांतर्गत कलह निर्माण होतो. यातून मग ज्येष्ठ नेत्यांना नारळ दिला जातो, अप्रत्यक्ष पद्धतीने त्यांना घरी बसवल्या जाते. हे सर्व घडते, त्या नेत्याला आपल्या कारकीर्दीत केव्हा पॉज घ्यावा हे न कळण्यामुळे. या नेत्यांनाही आपल्या कारकीर्दीत कधी पॉज घेऊन नवीन लोकांना संधी द्यावी हे समजायलाच हवे. टिव्हीवर सुरू असलेल्या मालिकांना सुद्धा कुठे थांबले पाहिजे, कधी पॉज घेतला पाहिजे हे न समजल्याने मालिका पाहण्यातला प्रेक्षकांचा इंटरेस्ट संपतो. पॉज आपल्याला आपल्या चुका दुरूस्त करून परत नव्याने सुरूवात करायची संधी निर्माण करून देतो.

चुकीच्या किंवा भरकटलेल्या मार्गांवरून मार्गक्रमण करणाऱ्या लोकांचे जर योग्य मार्गदर्शनाने डोळे उघडले जाऊन त्यांनी त्या सवयीच किंवा त्या वाईट मार्गावरील आपला प्रवास पॉज केला तर? तर त्यांना त्यांचे आयुष्य परत नव्याने रिस्टार्ट करण्याची सुवर्ण-संधी प्राप्त होईल. पॉज आपल्या आयुष्यात किती महत्वाचा असतो हे आणखी योग्यप्रकारे स्पष्ट होण्यासाठी आपण एक इंटरेस्टिंग गोष्ट जाणून घेऊया.

२००७ मध्ये 'वॉशिंग्टन पोस्ट' या वृत्तपत्राने एक सोशल एक्स्पेरीमेंट केला होता. जोशुआ बेल हा जगप्रसिद्ध वायोलीन वादक या प्रयोगात सहभागी झाला होता. जोशुआ एके दिवशी सकाळी वॉशिंग्टन मधील एका मेट्रो स्टेशनवर आपल्या वायोलीन सह, एका डस्टबीन शेजारी जाऊन बसला. साध्या कपड्यांच्या पेहरावात जोशुआ तिथे बसून वायोलीन वाजवत होता. सकाळची वेळ असल्याने सर्व लोकांची ऑफिसमध्ये पोहोचण्याची लगबग होती. जोशुआ मात्र शांतपणे वायोलीन वादनात मग्न झालेला होता. सुरुवातीला त्याच्याकडे कोणाचेच लक्ष गेले नाही. काही मिनिटांनी त्याचं ते सुरेल वादन ऐकून एक मनुष्य थोडा थबकला. पण थांबला मात्र नाही. पुढे निघून गेला. जोशुआ मात्र वादनात गर्क होता. लोक पाहायचे. कोणी एक-दोन मिनिटांच्या पॉज घ्यायचे. कोणी त्याच्या-पुढे काही डॉलर ठेवून निघून जात होते. काही तासांच्या त्याच्या या सामाजिक प्रयोगात त्याला अनेकविध अनुभव आले. काहींनी केवळ कटाक्ष टाकला. काहींनी थोडा वेळ थांबून त्या जगप्रसिद्ध वादकाची ती फ्री कॉन्सर्ट ऐकली. काहींनी सहानुभूती म्हणून काही डॉलर्स ठेवले. पण कोणीही पूर्णवेळ त्या महान वादकाची फ्री कॉन्सर्ट ऐकण्यासाठी दिर्घ पॉज घेतला नाही. एवढ्या प्रसिद्ध वादकाच्या फ्री कॉन्सर्ट मध्ये फ्रंट सीट मिळवण्याची चालून आलेली संधी कोणीच हेरू शकलं नाही. काही मिनिटांचा पॉज घेऊन नकळतपणे जोशुआ बेलच्या कॉन्सर्टचा, त्याच्या सुरेल वादनाचा आस्वाद घेता आला असता. याच घटनेच्या काही दिवसांपूर्वी बोस्टनच्या सिंफनी हॉलमध्ये जोशुआ बेलची एक कॉन्सर्ट आयोजित केल्या गेली होती. त्या कॉन्सर्टची तिकिट १०० डॉलर्स एवढी होती. तरीही ती कॉन्सर्ट हाऊसफुल ठरली होती. त्यादिवशी मेट्रो स्टेशनवर केलेल्या प्रयोगात मात्र हा प्रख्यात वादक २७ लोकांनी दिलेले फक्त ३२ डॉलर्सच कमावू शकला होता. सिंफनी हॉलमधील कॉन्सर्ट वेळी जोशुआने जी महागडी वायोलीन वापरली होती,

तीच वायोलीन त्या मेट्रो स्टेशनवरील प्रयोगात सुद्धा वापरली होती. पण तरीही त्याला तिथे आलेले अनुभव प्रचंड विरोधाभास निर्माण करणारे होते.

"या सर्व घटनेचं विश्लेषण करताना काही निष्कर्ष प्राप्त होतात. मानवी स्वभावानुसार सौंदर्य, परीमाण या गोष्टीही बरेचदा एखाद्याच्या कलेचे कौतुक करताना आड येतात. एखादी वस्तु कोणाच्या कपाटात विकेला जेव्हा असते, तेव्हा ती सर्वांनाच अपील करते. पण तीच वस्तु जेव्हा गोडाऊनमध्ये जमिनीवर ठेवलेली दिसते तेव्हा त्या वस्तुबद्दल विचार करण्याचा दृष्टीकोन वेगळा असतो. साध्या पेहरावात महागडी वायोलीन वाजवणाऱ्या जोशुआच्या वादनाने सर्वांना अपील तर केले होतेच. पण त्यांनी पॉज का घेतला नाही, त्याच्या कलेची दाद देण्यासाठी? तर त्याच्यामागे त्यांची मानसिकता किंवा मनात अशा स्ट्रीट आर्टिस्ट बद्दल असलेले गृहितक त्यांना पॉज घेण्यापासून रोखत होते. असेही, दुसऱ्या दिवशी वॉशिंग्टन पोस्ट मध्ये या प्रयोगाबद्दल वाचल्यावर अनेकांना वाटलं असेल, "अरे यार...! आपण त्याच्या समोरून निघुन गेलो होतो रे. लक्षात कसं आलं नाही की जोशुआ बेल होता म्हणून. एवढी मस्त संधी वाया गेली. आपण थोडा वेळ थांबुन ऐकलं असतं त्यांच वादन तर किती छान वाटलं असतं." अशी खंतही काही जणांनी व्यक्त केली असावी. मानवी स्वभावानुसार आपण प्रत्येक गोष्टीला एक परीमाण सेट करून ठेवत असतो. तसंच परिमाण, सौंदर्य आपण शोधतो. ते जर मॅच होत असेल तरच आपण पॉज घेतो अनेकदा. नाहीतर थांबण्याची तसदी पण आपण दाखवत नाही. जोशुआने हॉलमध्ये कॉन्सर्ट घेतल्यावर महागडी तिकिट खरेदी करून गर्दी करणारे लोकं जेव्हा जोशुआ किंवा अन्य स्ट्रीट आर्टिस्ट दिसतो तेव्हा त्याच्या कलेची दाद देण्यासाठि दोन-पाच मिनिटांचा पॉज ही घेत नाही. कारण आपल्या मनातील गृहितके तेव्हा आड येतात. या घटनेवरून असा निष्कर्ष काढता येईल कि आपण बरेचदा पॉज न घेतल्यामुळे आयुष्यातील अनेक सुवर्णक्षण गमावून बसतो. त्या क्षणांच्या आपण अगदी जवळ असूनही त्यांचे साक्षीदार होण्याची संधी आपण चुकवतो. नंतर मात्र याचं शल्य आपल्याला कायम बोचत राहते.

या लेखातून मी एवढंच सांगेल कि आयुष्यात आपण सर्वच व्यस्त असतो. पण तरीही एकमेकांप्रती, आपल्या आप्तस्वकीयांप्रती कृतज्ञता व्यक्त करायला, एखाद्या कलाकाराच्या कलेचे कुठलेही परिमाण न लावता कौतुक करायला, मार्गदर्शन करायला, आयुष्यातील अनेक सोनेरी क्षण आपल्या आठवणींच्या कप्प्यात बंदिस्त करायला 'पॉज' घेतलाच पाहिजे. शेवटी एक विनंतीवजा सल्ला देईल कि कर्तव्य आणि जबाबदारीतून स्वतः आपले छंद जोपासण्याकरीता आठवणीने थोडासा पॉज आवर्जून घ्यावा.

लेख वाचल्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी अथवा मार्गदर्शन करण्यासाठी आपण जर पॉज घेतला तर माझ्यासाठी ती अत्यानंदाची गोष्ट असेल. थांबतो. धन्यवाद...!



-अजिंक्य वि. देशमुख
अमरावती.

